| | | | |
|---|---|---|---|
| MHLA030049592023 | दाखल दिनांक | :- | १६/०९/२०२३ |
| | नोंदणी दिनांक | :- | ०३/१०/२०२३ |
| | निकाल दिनांक | :- | ०७/०८/२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०२व १०म १४दि |

**<u>लातूर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. ६, ता. लातूर</u>**

**<u>जि. लातूर यांचे न्यायालयात</u>**

( पिठासीन अधिकारी श्रीमती एम.एस.निकम)

न्यायनिर्णय घोषीत दिनांक –०७ ऑगस्ट, २०२६

( नियमित फौजदारी खटला क्र. १५७८/२०२३, नि.क्र.२४)

गुन्हा नोंद क्र.२३६/२०२३, मुरुड पोलीस स्टेशन, लातूर.

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>मुरुड पोलीस स्टेशन, लातूर. |
| अभियोग पक्षातर्फे | | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. के. बी. मस्के |
| आरोपी | | **१. ईश्वर नारायण जगताप,**<br>वय – १९ वर्ष, व्यवसाय –शेती,<br>रा. अंकोली, लातूर. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. बी. एल. शिंदे<br>श्री. पी. एन. भाकरे. |

**<u>भाग–ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ११/०८/२०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक | :- | ११/०८/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | :- | १६/०९/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०१/१०/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १५/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ०७/०८/२०२६ |
| शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक असल्यास | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | दोषारोप कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **ईश्वर नारायण जगताप** | दि. १३/०८/२०२३ रोजी कलम ४१ (अ)(१) प्रमाणे नोटीस | दि. ०१/१०/२०२४ | भा.द.वि. कलम ३२४, ३२३ , ५०४ व ५०६ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/आरोपी पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

### अ. अभियोग पक्ष

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | राम हरिश्चंद्र मुळे | फिर्यादी | P.W.-1 |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**क.न्यायालयीन साक्षीदार**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्ष/आरोपी /न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन पुरावा**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्रं. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक ०७/०८/२०२६ रोजी घोषित केले)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले आहे.

०२. अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे –

दि.११/०८/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे अंकोली येथे शेत शिवार अंकोली गट नं. ५९ मध्ये बांधावरुन शेळ्या का घेऊन जाता याची फिर्यादीने विचारणा केल्यावर, आरोपीने फिर्यादीस शेत काय तुझ्या बापाचे आहे काय असे म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहाण केली व हातात दगड घेवून फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामूळे फिर्यादीने आरोपीविरुध्द मुरुड पोलीस ठाणे, लातूर येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादीवरुन मुरुड पोलीस ठाणे, लातूर येथे भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये आरोपीविरुध्द गुन्हा रजिस्टर नं. २३६/२०२३ दाखल झाला. सदर गुन्हयाचा तपास पोह/९३५ एन. एच. जाधव यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तसेच, साक्षीदारांचे जबाब नोंदवले व इतर आवश्यक तो

तपास करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** दोषारोपातील मजकुर व दाखल कागदपत्र पाहून आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये निशाणी क्र. १२ वर दोषारोप ठेवला. सदर दोषारोप आरोपीला त्याच्या भाषेमध्ये वाचून दाखवला असता त्याने तो नाकबूल केला.

**०५.** अभियोग पक्षातर्फे फिर्यादी राम मुळे (सा.क्र.१) यांची साक्ष नोंदवण्यात आली. आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा पटलावर न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) प्रमाणेचे जबाब नोंदवण्यात आले नाहीत.

**०६.** अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञांचा व आरोपीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यानंतर अभिलेखाचे अवलोकन केले. त्यानुसार खालील मुद्दे माझे निष्कर्षाकामी निर्माण झाले. सदरचे मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, दि.११/०८/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे अंकोली येथे शेत शिवार अंकोली गट नं. ५९ मध्ये आरोपीने फिर्यादीस दगडाने डोक्यात मारुन जखमी केले? | नाही. |
| २. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन दुखापत केली ? | |
| ३. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला आणि सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले? | नाही. |
| ४. | अभियोग पक्ष हे शाबित करतो का की, वरील नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस दमदाटी करुन फौजदारी धाकदपटशा निर्माण केला? | नाही. |
| ५. | कोणता आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

**कारणमिमांसा**

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करिताः–</u>**

**०७.** आरोपीविरुध्दचे गुन्हे शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी राम हरिश्चंद्र मुळे (सा.क्र.१) यांना तपासले. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये असे कथन केले की, ते आरोपीला ओळखतात. आरोपीने त्यांना कोणतीही मारहाण केलेली नाही. सदर घटनेची त्यांनी गैरसमजुतीने पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. त्यावरील स्वाक्षरी त्यांनी मान्य केली आहे परंतू, फिर्यादीतील मजकुराबाबत त्यांना काही माहिती नसल्याचे कथन केले.

**०८.** सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला सहाय्य केले नाही त्यामुळे त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतू, तरीही सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास मदत होईल असा कसलाही पुरावा दिलेला नाही. सदर साक्षीदाराने आपआपसांत

तडजोड झाल्याची बाब मान्य केली आहे.

**०९.** आपआपसांत तडजोड झाल्यामुळे फिर्यादीने पुरावा बंद पुरसीस निशाणी क्र. २३ वर दिली. सदर पुरसीसनुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यामुळे अभियोगपक्षाने इतर साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली नाही. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही व अभियोग पक्षातर्फे इतर कुठलाही असा पुरावा देण्यात आलेला नाही ज्यावरून आरोपीविरूध्द लावलेले आरोप सिध्द होउ शकतील.

**१०.** वरील सर्व कारणास्तव न्यायालयाच्या अभिलेखावर आरोपीने दोषारोपाप्रमाणे गुन्हा केला आहे असा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ४ चे नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करिताः–</u>**

**११.** मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष विचारात घेता, अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे गुन्हे शाबित करु शकलेला नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ५ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी ईश्वर नारायण जगताप यांची भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका दयावा.

(न्याय निर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by MADHUMEETA SHIVAJI NIKAM
Date: 2026.08.07 17:34:33 +0530

(एम. एस. निकम)

**दिनांक – ०७/०८/२०२६** **६ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**

**लातूर**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D.F. file Order are same word for word as per original order.

Name of Stenographer : N. D. Tandale,
Court Name : Smt. M.S. Nikam, 6th Addl. C.J.M., Latur
Order Date : 07/08/2026
Order signed by presiding officer on : 07/08/2026
Order uploaded on : 07/08/2026